पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.

क प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक- १२

स भा वृ त्तां त

दिनांक २/५/२०१८ वेळ-दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. “क” प्रभाग समिती मासिक सभा मंगळवार दि.२/५/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) मा.लोंढे नम्रता योगेश | सभापती |
| २) मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ३) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश | |
| ४) मा.लांडगे सारिका संतोष | |
| ५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव | |
| ६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव | |
| ७) मा.राहुल हनुमंतराव भोसले | |
| ८) मा.समीर मोरेश्वर मासुळकर | |
| ९) मा.धावडे गोपीकृष्ण भास्कर | स्विकृत सदस्य |
| १०) मा.सागर सुखदेव हिंगणे | स्विकृत सदस्य |
| ११) मा.श्रीमती वैशाली प्रशांत खाडये | स्विकृत सदस्य |

याशिवाय मा.प्रदिप मुथा – प्रशासन अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.रविंद्र पवार –कार्यकारी अभियंता पापु,मा.एन.के.देशमुख- कार्यकारी अभियंता विदयुत, मा.दवंडे-उपअभियंता पापु, मा.माने- उपअभियंता स्था, वायकर- उपअभियंता स्थापत्य, मा.बी.बी.कांबळे-सहा.आरोग्याधिकारी,श्री.वसंत उगले- लेखाधिकारी, श्री.रमेश भोसले-मुख्य आरोग्य निरीक्षक, श्रीमती दमयंती पवार, हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

----

उपस्थित सन्मा.सदस्य/सदस्या, अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- १) प्रभाग क्र.६ मधील सर्वे नं.२३ हनुमाननगर भगतवस्ती येथे नवीन नामफलक लावण्यास मंजुरी मिळण्याबाबत- मा.राजेंद्र लांडगे,मा.यशोदा बोइनवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- २) प्रभाग क्र.८ से.क्र.३ येथील असणा-या तिरुपती चौकाचे नांव बदलून बजरंग चौक असे करणेबाबत-मा.नम्रता लोंढे,मा.सारिका लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ३) बालभवन येथील जुन्या इमारतीचे ट्रक्चर ऑडिट करणेबाबत-मा.गीता मंचरकर,मा.समीर मासुळकर,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ४) प्रभाग क्र.६ व २ मध्ये नामफलक लावण्याबाबत-मा.नम्रता लोंढे,मा.सारीका लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमकां- ५) प्रभाग क्र.८ येथील एमआयडीसी एस ब्लॉक मधील मोकळी जागा क्र.३७ (ए-२५९१०) जवळील जुनी मुतारी काढणेबाबत-मा.सारीका लांडगे,मा.यशोदा बोइनवाड यांचा प्रस्ताव.

दिनांक ६/३/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक – ३ विषय क्रमांक- १

दिनांक-२/५/२०१८

सुचक-मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक-मा.यशोदा बोइनवाड

संदर्भ-मा.राजेंद्र लांडगे,मा.यशोदा बोइनवाड यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६ मध्ये सर्वे नं. २३ हनुमाननगर भगतवस्ती येथे नवीन नामफलक खालीलप्रमाणे देण्यात यावे.

**"कै.अनिल तापकीर पथ"**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – ४ विषय क्रमांक- २

दिनांक-२/५/२०१८

सुचक-मा.नम्रता लोंढे अनुमोदक-मा.सारीका लांडगे

संदर्भ-मा.नम्रता लोंढे,मा.सारीका लांडगे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.८ से.क्र.३ येथे तिरुपती चौक आहे सदरचा प्रभाग हा यापुर्वी "ई" क्षेत्रीय कार्यालयामध्ये होता. परंतु सदरचा प्रभाग हा सध्या "क" क्षेत्रीय कार्यालयामध्ये येत असल्याने सदर चौकाचे यापुर्वी **"तिरुपती चौक"** नांव देणेचा ठराव रद्द करणेत येत आहे.व सदर चौकाचे **"बजरंग चौक"** असे नामकरण करणेत यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – ५ विषय क्रमांक- ३

दिनांक-२/५/२०१८

सुचक-मा.समीर मासुळकर अनुमोदक-मा.राहूल भोसले

संदर्भ-मा.गीता मंचरकर,मा.समीर मासुळकर,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

पिं.चिं.शहरातील खराळवाडी या भागात प्रभाग क्र. ९ मधील बालभवन ही जुनी इमारत पाडून (इमारतीचे ट्रक्चर ऑडीट करुन घेणे) त्याचा रिपोर्ट घेणे व त्या जागी सुसज्य व भव्य इमारत विकसीत करावी.यासाठी बांधकाम परवानगी मिळून व त्या नियमावलीत जास्तीत जास्त ट्रक्चर ऑडीट करणेत यावे व नव्याने इमारत विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ६ विषय क्रमांक- ४

दिनांक-२/५/२०१८

सुचक-मा.नम्रता लोंढे अनुमोदक-मा.सारीका लांडगे

संदर्भ-मा.नम्रता लोंढे,मा.सारीका लांडगे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६,९ व २ मध्ये नवीन क प्रभागातील स्विकृत सदस्य यांचे जनसंपर्क व निवासस्थानाचे नामफलक लावण्यात यावे. त्यांची नांवे पुढीलप्रमाणे १) मा.श्री.सागर सुखदेव हिंगणे २) मा.श्री.गोपीकृष्ण भास्कर धावडे ३) मा.सौ.वैशाली प्रशांत खाडये

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – ७ विषय क्रमांक- ५

दिनांक-२/५/२०१८

सुचक-मा. सारीका लांडगे अनुमोदक-मा.यशोदा बोइनवाड

संदर्भ-मा.सारीका लांडगे,मा.यशोदा बोइनवाड यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.८ येथील इंद्रायणीनगर चौकापासून एम आय डी सी रस्त्याने डायनोमिक कंपनीपर्यंतचा रस्ता विकसीत करणेचे काम चालू असून काम प्रगतीपथावर आहे या रस्त्यामध्ये साखळी क्र.५७० अंतरावर एम आय डी सी एस ब्लॉक मधील मोकळी जागा क्र.३७ ( ए – २५९१०) येथे जुनी सुमारे २० वर्षापूर्वीची मुतारी रस्त्याच्या मध्ये येत असल्याने काढणे आवश्यक आहे.तरी सदरची मुतारी काढणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर सर्वांचे आभार मानून मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(**नम्रता योगेश लोंढे** )
सभापती
क प्रभाग समिति, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – २६.
क्र-कक्षेका/कावि /३०/२०१८.
दिनांक ०७ /५/२०१८

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत-सर्व संबंधित विभाग

-------------------